17 AUG 2026

सकाळ

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ध्वजवंदनाने जागविला स्वातंत्र्याचा अभिमान

## संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालयांत उत्साह; सामाजिक बांधिलकीही जपली

■ सकाळ वृत्तसेवा

**भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त विविध संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालये, मंडळे आदी ठिकाणी ध्वजवंदन झाले. विविध कार्यक्रमांचे आयोजन केले.**

**• शिवाजी विद्यापीठ**

कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. सायबर महाविद्यालयामार्गे तिरंगा रॅली काढली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. राजाराम गुरव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सागर डेळेकर, डॉ. सावळीराम घाणे, डॉ. कबीर खराडे, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. धनंजय सुतार, डॉ. अभिजित गाताडे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, अधिसभा सदस्य विष्णू खाडे, वसंत एकले आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
17 AUG 2026
पुण्यनगरी ...वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात तिरंगा रॅली



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. वंदे मातरम्, राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय छात्रसेनेच्या कॅडेटस्नी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. यानंतर कुलगुरू डॉ. कामत यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, मानव्य विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावळीराम घाणे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. अभिजित गाताडे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, अधिसभा सदस्य विष्णू खाडे, सुरक्षा अधिकारी वसंत एकले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2026
जनप्रवास



# विद्यापीठात तिरंगा रॅलीला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा प्रतिसाद

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या निमित्ताने काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

ध्वजारोहणानंतर वंदे मातरम, राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. यानंतर कुलगुरू डॉ. कामत यांनी प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यापीठाच्या मुख्य इमारतीपासून सायबर महाविद्यालयामार्गे तिरंगा रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षक, अधिविभागांचे प्रमुख, प्रशासकीय कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. राजाराम गुरव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सागर डेळेकर, डॉ. सावळीराम घाणे, डॉ. कबीर खराडे, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. धनंजय सुतार, डॉ. अभिजीत गाताडे, सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 AUG 2026

सकाळ



**कोल्हापूर :** पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. सोबत लेखक डॉ. दीपक भोसले, विकास अवघडे, अॅड. डॉ. अश्विनी बाटे, माधुरी भाले.

# ऑर्केस्ट्रा कलाकारांच्या आयुष्यावरील पुस्तक दिशादर्शक : कुलगुरू कामत

## 'मेलोडी अँड चॅलेंजेस ऑफ ऑर्केस्ट्रा प्लेयर्स'चे प्रकाशन

कोल्हापूर, ता. १६ : ऑर्केस्ट्रातील कलाकारांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकून केवळ समस्यांचीच नव्हे, तर उपायात्मक योजनांची मांडणी करणारे हे पुस्तक दिशादर्शक ठरेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी व्यक्त केला.

'मेलोडी अँड चॅलेंजेस ऑफ ऑर्केस्ट्रा प्लेयर्स इन कोल्हापूर' या डॉ. दीपक भोसले व विकास अवघडे लिखित पुस्तकाच्या प्रकाशन समारंभ त्यांच्या हस्ते झाला. यावेळी ते बोलत होते. पुस्तकाचे सहलेखक विकास अवघडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भोसले यांनी पुस्तक लिहिण्यामागील उद्देश स्पष्ट केला. यावेळी अॅड. डॉ. अश्विनी बाटे, माधुरी भाले, डॉ. विनायक साळोखे उपस्थित होते. रवी सुतार, कुमार घोरपडे, राजू गोरड, मुकुंद सुतार, अमोल बुचडे, माधुरी बिरांजे, किशोर कुमार भारती, हिंदूराव अवघडे, संजय परब यांचे मार्गदर्शन मिळाले. सायबर संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. ए. शिंदे, सचिव ऋषिकेश शिंदे, संचालक डॉ. आर. के. टेलर यांचे प्रोत्साहन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2026
जनप्रवास

# वाद्य वृंद कलाकारांच्या आयुष्यावरील ऑर्केस्ट्रा पुस्तक महत्वपूर्ण : कुलगुरू

**जनप्रवास : कोल्हापूर**

वाद्यवृंद कलाकारांच्या आयुष्यावरील ऑर्केस्ट्रा पुस्तक महत्वपूर्ण आहे, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी काढले. मेलोडी अँड चॅलेंजेस ऑफ ऑर्केस्ट्रा प्लेयर्स इन कोल्हापूर या डॉ. दीपक भोसले आणि विकास अवघडे लिखित पुस्तकाच्या प्रकाशन समारंभावेळी ते बोलत होते.



ऑर्केस्ट्रा विषयावरील पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. कामत. सोबत लेखक डॉ. दीपक भोसले, विकास अवघडे, डॉ. अश्विनी बाटे, माधुरी भाले आदी.

या प्रकाशन कार्यक्रमाला अँड. डॉ. अश्विनी बाटे, पीएचडी संशोधक माधुरी भाले, सायबरचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विनायक साळोखे यांची उपस्थिती होती तर कोल्हापुरातील ऑर्केस्ट्रा परिवारातील रवी सुतार, कुमार घोरपडे, राजू गोरड, मुकुंद सुतार, अमोल बुचडे, माधुरी बिरांजे, किशोर कुमार भारती, हिंदुराव अवघडे, संजय परब यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तर सायबर संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. ए. शिंदे, सचिव ऋषिकेश शिंदे, संचालक डॉ. आर. के. टेलर यांचे प्रोत्साहन लाभले.

यावेळी कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी खरंतर ऑर्केस्ट्रा प्लेयर्स सर्वसामान्यांच्या विविध प्रसंगांमध्ये आपली भूमिका संगीताची मेजवानी देऊन सातत्यपूर्वक बजावत असतात. परंतु दुर्दैवाने त्यांच्या आयुष्यामध्ये संघर्ष कायमस्वरूपी पाहिला मिळतो. या पैलूंवर प्रकाश टाकणारे हे पुस्तक आहे.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2026
पुढारी

# देशभक्तीपर गीतांनी राष्ट्रप्रेमाची भावना जागृत



**कोल्हापूर : स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला विद्यापीठात देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करताना संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी. (छाया : नाज ट्रेनर)**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम झाला. 'वंदे मातरम्', 'सारे जहाँ से अच्छा'सह विविध देशभक्तीपर गीतांनी उपस्थितांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत केली.

- स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला विद्यापीठात गीतांचा कार्यक्रम
- कुलगुरूंच्या हस्ते आज ध्वजारोहण

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला हर घर तिरंगा अभियान आणि 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या १५० वर्षांच्या निमित्ताने देशभक्तीपर गीतांचा विशेष कार्यक्रम झाला. 'सारे जहाँ से अच्छा', 'दे दी हमें आजादी', 'सैनिक हो तुमच्यासाठी', 'अब तुम्हारे हवाले', 'हर घर तिरंगा', 'जहाँ डाल डाल पर' इत्यादी सुमधूर देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले.

दरम्यान, स्वातंत्र्यदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी (दि. १५) सकाळी ८ वाजता कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात ध्वजारोहण होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ध्वजारोहणानंतर विद्यापीठ परिसरातून सायबर चौकमार्गे तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विविध विभागांचे अधिष्ठाता, अधिकारी, कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि विद्यार्थी सहभागी होणार आहेत.